# दूर शिक्षण केंद्रातून २२५ जवान पदवीधर

## शिवाजी विद्यापीठाच्या उपक्रमाचे सीमेवर संरक्षण करणाऱ्यांना पाठबळ

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. ७ : सीमेवर प्राणांची बाजी लावणाऱ्या जवानांना शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राचा लाभ झाला आहे. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात सुमारे २२५ जवानांनी बहिस्थ पद्धतीने परीक्षा देऊन पदवी किंवा पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. यामध्ये सातारा जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे १५३ जवानांनी पदवी घेतली आहे. प्रवेश अर्ज भरणे, पुस्तके यामध्ये जवानांना सवलती दिल्या जातात. अत्यंत खडतर स्थितीमध्ये जवान आपले शिक्षण पूर्ण करतात.

कोणाला परिस्थितीमुळे तर कोणाला कौटुंबिक कारणामुळे आपले शिक्षण पूर्ण करता येत नाही. लग्न ठरल्याने बहुतांशी मुलींचे



शिक्षण थांबते, मात्र आयुष्याच्या एका टप्प्यावर जीवनाला स्थिरता येते; मग शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा होते. त्यावेळी समोर पर्याय नसतो. अशांना आपले शिक्षण पूर्ण करता यावे, यासाठी दूर शिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. हजारो जणांनी याचा लाभ घेत आपले शिक्षण पूर्ण केले. या दूर शिक्षण केंद्राचा फायदा सीमेवर संरक्षण करणाऱ्या जवानांनाही झाला. गेल्या वर्षभरामध्ये २२५ जवानांनी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला.

पदवी घेतल्याचा फायदा जवानांना त्यांच्या नोकरीमध्ये होतो. अधिकारी म्हणून काम करता येते. पगारवाढ व अन्य सुविधांसाठीही पदवी असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते. दिवसभराच्या खतडर नोकरीनंतर अभ्यास करायचा; मग परीक्षेसाठी रजा काढून गावी यायचे आणि परीक्षा द्यायची, असे परिश्रम घेऊन हे जवान पदवी घेतात. सातारा जिल्ह्यात लष्करात असणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने दूर शिक्षणातून पदवी घेतलेल्या जवानांची संख्याही येथे सर्वाधिक आहे.

### दूर शिक्षण केंद्राच्या जवानांना सुविधा

- प्रवेश घेण्यासाठी किंवा परीक्षा अर्ज भरण्यासाठी स्वतः यावे लागत नाही. नातेवाईक, मित्र अर्ज भरू शकतात.
- कुटुंबीयांच्या सहीने त्यांच्या गावाजवळील स्टडी सेंटरमधील पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. स्वतः यावे लागत नाही.
- अभ्यासक्रमातील उपलब्ध नसलेल्या पुस्तकांची प्रिंट काढून दिली जाते.

| जिल्हा | जवानांची संख्या | पोलिस | अग्निशमन |
|---|---|---|---|
| सातारा | १५३ | १५ | ५ |
| कोल्हापूर | ३९ | ०३ | - |
| सांगली | ३३ | १२ | - |
| एकूण | २२५ | ३० | ५ |

**शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेल्यांना प्रवाहात आणणे, हाच दूर शिक्षण केंद्राचा उद्देश आहे. जवानांसाठी उपलब्ध करून दिलेल्या विशेष सुविधांमुळे त्यांचे पदवी घेण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये अभ्यास करून हे जवान पदवी संपादन करतात. या जवानांनी समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे.**
**- प्रा. डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करतात; पण सीमेवर आपल्यासाठी लढणाऱ्या जवानाला दूर शिक्षण केंद्राचा लाभ होतो. त्यावेळी आम्हाला आमच्या कामाचे समाधान मिळते.**
**- डॉ. एम. ए. अनुसे,**
संचालक, दूर शिक्षण केंद्र

पुढारी

# वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात करिअरची संधी

## डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल; विद्यापीठात मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

औषध निर्माण क्षेत्रामध्ये व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी त्याचबरोबर रोजगार निर्मितीसाठी सध्याच्या परिस्थितीत एम.एस्सी.- मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. यात जागतिक करिअरच्या संधी आहेत, असे प्रतिपादन युनेस्को बायोएथिक्सचे प्रमुख तथा जर्मनी येथील होश्युल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् प्रा. डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बायोकेमिस्ट्री अधिविभागात एम.एस्सी.- मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी हॅनोव्हर विद्यापीठाचे डॉ. ज्ञानेश लिमये, पुण्याच्या 'सीडीजीएमआय'चे संचालक प्रा. डॉ. अतुल कापडी, कोल्हापूरच्या मनोरमा इन्फो-सोल्युशनच्या कार्यकारी संचालक अश्विनी दाणीगोंड यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रा. गेरहार्ड फोर्टवेंगेल. शेजारी डॉ. ज्योती जाधव, अश्विनी दाणीगोंड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. ज्ञानेश लिमये, डॉ. अतुल कापडी, डॉ. के. डी. सोनावणे. (छाया : नाज ट्रेनर)**

डॉ. फोर्टवेंगेल म्हणाले, स्वत:च्या प्रगतीबरोबरच देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी हा अभ्यासक्रम राजमार्ग आहे. या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय कंपनी कोर्स शिकण्याची व योग्य प्रशिक्षणाअंती आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ होण्याची संधी संशोधक, विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. डॉ. ज्ञानेश लिमये म्हणाले, वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात कुशल प्रशिक्षित मनुष्यबळाची निकड आहे. उद्योग क्षेत्राला कुशल, निष्ठावान, जिज्ञासू व संशोधक वृत्ती जोपासणाऱ्या मनुष्यबळाची फार गरज आहे. ती या माध्यमातून पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठ व होश्युल हॅनोव्हर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. जागतिक पातळीवर, देशाचे, विद्यापीठाचे नाव लौकिक उंचावण्याची संधी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आहे. एम.एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. बायोकेमिस्ट्री अधिविभागप्रमुख डॉ. जे. पी. जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

लोकमत

# वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात जागतिक करिअरच्या संधी

## गेरहार्ड फोर्टवेंगेल : शिवाजी विद्यापीठात 'एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट'चे उद्घाटन

**कोल्हापूर :** औषध निर्माण क्षेत्रामध्ये व्यवसाय वृद्धिंगत करणे, रोजगार निर्मितीसाठी एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम उपयुक्त आहे, असे प्रतिपादन 'युनेस्को बायोएथिक्स'चे प्रमुख तथा जर्मनी येथील होश्युल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् प्रा. डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठात 'एम.एस्सी.- मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट' या अभ्यासक्रमाच्या



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट'च्या उद्घाटनप्रसंगी प्रा. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्योती जाधव, अश्विनी दानीगोंड, देवानंद शिंदे, ज्ञानेश लिमये, आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी, तर हॅनोव्हर विद्यापीठाचे डॉ. ज्ञानेश लिमये, मनोरमा इन्फो-सोल्यूशनच्या अश्विनी दानीगोंड, सीडीजीएमआयचे संचालक प्रा. डॉ. अतुल कापडी उपस्थित होते.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'जागतिक पातळीवर, देशाचे, विद्यापीठाचे नाव लौकिक उंचावण्याची संधी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आहे. डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जे. पी. जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. लिमये म्हणाले, वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात कुशल प्रशिक्षित मनुष्यबळाची निकड आहे.

# वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात करिअरच्या संधी

## डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांचे प्रतिपादन ; बायोकेमिस्ट्री अभ्यासक्रम उद्‌घाटन सोहळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : सध्याच्या परिस्थितीमध्ये औषध निर्माण क्षेत्रामध्ये व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी त्याचबरोबर रोजगारनिर्मितीसाठी एम. एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. यात जागतिक करिअरच्या संधी आहेत, असे प्रतिपादन युनेस्को बायोएथिक्सचे प्रमुख तथा जर्मनी येथील होश्युल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् प्रा. डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या बायोकेमिस्ट्री अधिविभागात एम. एस्सी. - मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटन सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल म्हणाले, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांतर्गत उत्साहाने व चिकित्सक पद्धतीने संशोधक वृत्ती जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर रोजगाराच्या प्रचंड संधी आहेत. स्वतःच्या प्रगतीबरोबरच देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी हा अभ्यासक्रम राजमार्ग आहे. या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय कंपनी कोर्स शिकण्याची व योग्य प्रशिक्षणाअंती आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ होण्याची संधी संशोधक, विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे.



डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगल

डॉ. ज्ञानेश लिमये बोलताना म्हणाले, वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात कुशल प्रशिक्षित मनुष्यबळाची अत्यंत निकड आहे. महानगरांमध्ये सहा महिने, वर्षभराच्या प्रशिक्षणानंतर अधिक मानधनासाठी नोकऱ्या बदलण्याचे प्रमाण मोठे आहे. या क्षेत्रात दीर्घकालीन यश मिळवायचे असल्यास असे घडता कामा नये. आज उद्योग क्षेत्राला कुशल, निष्ठावान, जिज्ञासू व संशोधक वृत्ती जोपासणाऱ्या मनुष्यबळाची फार गरज आहे. ती या माध्यमातून पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना निश्चितपणे आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ आणि होश्युल हॅनोव्हर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. शिवाजी विद्यापीठातला हा तशा अर्थाने पहिलाच आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम आहे. असा आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम शिकण्याची संधी आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेली आहे. जागतिक पातळीवर, . देशाचे, विद्यापीठाचे नाव लौकिक उंचावण्याची संधी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आहे.'

या प्रसंगी डॉ. अतुल कापडी, अश्विनी दाणीगोंड यांनीही मनोगत व्यक्त केले. एम. एस्सी.- मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. बायोकेमिस्ट्री अधिविभागप्रमुख डॉ. जे. पी. जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकीय माहिती व्यवस्थापनमध्ये करिअरच्या संधी

## जर्मन प्राध्यापक डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठमध्ये अभ्यासक्रमाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सध्याच्या परिस्थितीमध्ये औषध निर्माण क्षेत्रामध्ये व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी एम.एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. यात जागतिक करिअरच्या संधी आहेत, असे प्रतिपादन युनेस्को बायोएथिक्सचे प्रमुख तथा जर्मनी येथील होश्‍युल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस्‌चे प्राध्यापक डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बायोकेमिस्ट्री अधिविभागात एम. एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम.एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. गेरहार्ड फोर्टवेंगेल. सोबत डॉ. ज्योती जाधव, अश्विनी दाणीगोंड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. ज्ञानेश लिमये, डॉ. अतुल कापडी, डॉ. के.डी. सोनावणे.**

डॉ. फोर्टवेंगेल म्हणाले, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाअंतर्गत उत्साहाने व चिकित्सक पद्धतीने संशोधक वृत्ती जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. स्वत:च्या प्रगतीबरोबरच देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी हा अभ्यासक्रम राजमार्ग आहे. या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय कंपनी कोर्स शिकण्याची व योग्य प्रशिक्षणाअंती आरोग्य क्षेत्रामधील तज्ज्ञ होण्याची संधी संशोधक विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे.

डॉ. ज्ञानेश लिमये म्हणाले, वैद्यकीय माहिती व्यवस्थापन क्षेत्रात कुशल प्रशिक्षित मनुष्यबळाची अत्यंत निकड आहे. महानगरांमध्ये सहा महिने, वर्षभराच्या प्रशिक्षणानंतर अधिक मानधनासाठी नोकऱ्या बदलण्याचे प्रमाण मोठे आहे. या क्षेत्रात दीर्घकालीन यश मिळवायचे असल्यास दिर्घ काळ संशोधन व्हायला हवे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम शिकण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. जागतिक पातळीवर, देशाचे, विद्यापीठाचे नाव लौकिक करण्याची संधी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मिळेल. ज्ञानाबरोबरच कला, क्रीडा आणि संस्कृतीचे आदान-प्रदान होईल.

यावेळी डॉ. अतुल कापडी, अश्विनी दाणीगोंड यांनी मनोगत व्यक्त केले. अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. बायोकेमिस्ट्री अधिविभागप्रमुख डॉ. जे. पी. जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी हॅनोव्हर विद्यापीठाचे डॉ. ज्ञानेश लिमये, पुण्याच्या 'सीडीजीएमआय'चे संचालक प्रा.डॉ. अतुल कापडी, कोल्हापूरच्या मनोरमा इन्फो-सोल्युशनच्या कार्यकारी संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी दाणीगोंड यांची प्रमुख उपस्थिती होती.